Date

## किल्ल्यांची प्रशासन व्यवस्था आणि नाविक धोरण :

### १) किल्ल्यांचे प्रशासन

- ~~प्रस्ता~~ प्रास्ताविक :

प्राचीन काळापासून संरक्षणाच्या दृष्टिकोनातून किल्ल्यांना महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. शत्रूपासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि सभोवतालच्या प्रदेशाची टेहळणी करता यावी. त्यावर नियंत्रण ठेवता यावे म्हणून बांधलेल्या वास्तूस किल्ला म्हणतात.

शिवरायांच्या काळात किल्ल्यांना महत्व प्राप्त झाले. दरम्यानच्या काळात डोंगरी किल्ले, भूईकोट किल्ले आणि जंजेरे किंवा जलदुर्ग असे तीन प्रकार होते.

- किल्ल्यांचे महत्व :

शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या साहाय्याने स्वराज्याची स्थापना केली. मराठ्यांच्या सत्तेवर आलेल्या संकटांचे निवारण केल्यामुळेच झाले. रियासतकार गो. स. सरदेसाई असे म्हणतात. की प्रत्येक किल्ला व तन्मयाचे परिवेष्ट प्रदेश हा शिवाजीच्या राज्य मालिकेतील एक घटकावलय होय. या बहुमोल दुर्गमालिकेमुळे शिवाजीने आपले राज्य बंदिस्त केले. शिवाजीची बहुतेक अचाट कृत्ये ह्या किल्ल्यांच्या योगाने तडीस गेली. अनेक आणीबाणीचे प्रसंग शिवाजीवर आले असता त्यातून निभावून जाण्यास हेच किल्ले त्यास उपयोगी पडले. कित्येक किल्ले स्वसंरक्षणाच्या सोयीचे, कित्येक अचानक शत्रूवर छापा घालून त्याचा पाडाव करण्यांच्या सोयीचे, कित्येक अचानक शत्रुवर छापा घालून त्यांचा पाडाव करण्यांच्या सोयीचे असे नावाजलेले असुन त्यांच्या योगाने मराठ्यांच्या तत्कालीन पराक्रमास एक प्रकारची विलक्षण रसाळता उत्पन्न झाली आहे.

किल्ले बहुत झाले. विनाकारण पैसा खर्च होतो आहे. असा अर्ज जवळच्या मंडळींनी शिवाजी महाराजांच्याकडे केला असता महाराज म्हणाले: जैसा कुणबी माळा घालून शेत राखीतो, तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस खिळे मारून बळकट करितात. तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे. किल्ल्यांच्या योगाने औरंगशहा सारख्याची उमर गुजरून जाईल. आपणास धर्मस्थापना व राज्यसंपादन करणे. सर्वास अन्न लावून शत्रूप्रदेश न होय. ते किल्ल्यामुळे होते. सर्वांचा निर्वाह दिल्लीशासारखा शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवे जुने तीनशेसाठ किल्ले हजरतीस आहेत. एक किल्ला एक वर्ष लढला तरी तीनशेसाठ वर्षे पाहिजे.

जेम्स डग्लस याने शिवाजी महाराजांच्या किल्ल्याचे

Scanned by CamScanner

महत्व सांगताना असे म्हटले आहे की त्यांचे सर्व सामर्थ्य किल्ल्यांवर अवलंबून होते. तो खराखुरा दुर्गस्वामी होता. त्याचा जन्म दुर्गात झाला. त्याला दुर्गामुळे वैभव प्राप्त. त्याचे किल्ले त्याच्या भारतातील शत्रूंना धाक होता त्यांच्या राज्याची ती संवर्धन भूमी होती त्याच्या विजयाचा तो पाया होता. त्यांच्या वाढत्या महत्वाकांक्षेचा तो जिना होता. दुर्ग हेच त्याचे निवासस्थान व तेच त्याच्या निवासस्थान व तेच त्यांच्या आनंदाचे निधान होते. कित्येक किल्ले त्याने बांधले. जे आधी बांधलेले होते त्या सर्वांना त्याने बळकटी आणली.

सेतू माधवराव पगडी किल्ल्यांचे महत्व सांगताना म्हणतात की पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या रांगा, अरुंद दऱ्या, वळणा-वळणाची तटपुंजी साधने यामुळे प्रदेशाच्या संरक्षणास नैसर्गिक बळकटी प्राप्त झाली. डोंगरमाथ्यावर बांधलेल्या किल्ल्यामुळे त्या भागाच्या संरक्षणास बळकटी प्राप्त झाली. अरुंद खिंडीमुळे शत्रूला येण्याजाण्यास अवघड व मराठ्यांना सोयीची पार्श्वभूमी लाभली. त्यामुळे प्रचंड व बलाढ्य शत्रूचा सुध्दा मराठे पराभव करू शकते.

थोडक्यात किल्ल्यांच्या सहाय्याने राजाला आपल्या मुलुखाचे संरक्षण करता येईल. शत्रूचे आक्रमण झाल्यास प्रजेचे किल्ल्यांचा आश्रय घेता असे. त्यांच्या अब्रूचे रक्षण होई. जवळपासच्या प्रदेशाची टेहळणी करता येईल. शिवकाळात किल्ला हा लष्करी आणि मुलकी प्रशासनाचे मुख्य केंद्र बनले होते.

• किल्ल्यांची नावे आणि संख्या:

शिवाजी महाराजांनी किल्ल्यांना संस्कृत नावे दिली. किल्ल्यांवर घडलेल्या घटनांवरून अथवा शेजारच्या गावांवरून किल्ल्यांना नावे दिली. डॉ. बाळकृष्ण आपल्या Shivaji The Great या ग्रंथात शिवकालीन किल्ल्यांच्या समर्थक नावांवरून त्या त्या किल्ल्यांचे वैशिष्ट्ये लक्ष दाखवून देतात उदा. सिंहगड (Lion Den) २) रायगड (Royal Fort). ३) प्रतापगड (Valour Fort) ४) विजयदुर्ग (Victory Fort). ५) कमळगड (Lotus Fort) इ. वरील किल्ल्यांच्या नावांमुळे स्फूर्ती निर्माण होते.

शिवकालीन किल्ल्यांची संख्या वेगवेगळी दिली आहे. कृष्णाजी अनंत सभासद यांनी सभासद बखरीस 240 इतकी किल्ल्यांची संख्या दिली आहे मल्हार रामराव चिटणीस यांनी चिटणीस बखरीत किल्ल्यांची संख्या ३१० एवढी दिली आहे. चित्रगुप्त बखरीस संख्या ३६० दिली आहे. गो. स. सरदेसाई यांनी किल्ल्यांची संख्या 300 दिली आहे प्रा. दि. वी.

Scanned by CamScanner

काळे यांनी शिवकालीन संख्या ४२६ एवढी दिली आहे. प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी याबाबत म्हणतात की बखरीत आढळणाऱ्या पण ज्या किल्ल्यांचे निश्चित ठिकाण सांगता येत नाही अशा किल्ल्यांची नोंद प्रा. दि. वी. काळे यांनी केली आहे. त्यात छावण्या आणि गढ्यांचा समावेश केला आहे. त्यामुळे किल्ल्यांच्या संख्येचा आकडा फुगला आहे. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांच्या मते शिवकालीन किल्ल्यांची संख्या ३०० ते ३५० इतकी आहे.

- किल्ल्यांचे बांधकाम आणि दुरुस्ती :

शिवकालीन किल्ल्यांचे बांधकाम, किल्ल्यांवरील इमारती आणि त्यांची दुरुस्ती या बाबी महत्त्वाच्या होत. दत्ताजीपंत वाकेनीस यांनी ८७ कलमी बखरीत म्हटले आहे की शिवाजीने प्रत्येक अभेद्य आणि सुंदर ठिकाणी किल्ला बांधला तो आपला शूर आणि विश्वासू सेवकांकडे सोपविला.

शिवाजी महाराजांचे सन १६७१-७२ मधील किल्ल्यांच्या बांधकामासाठी आणि दुरुस्तीसाठी केलेले अंदाजपत्रक उपलब्ध झालेले आहे त्यात रायगडसाठी ५०,००० होन, सिंहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, विशाळगड, प्रतापगड, पुरंदर व राजगड किल्ल्यांसाठी प्रत्येकी १०,००० होन, प्रचंडगड, सुधागड, लोहगड इ. साठी ५००० होनांची तरतूद किरकोळ दुरुस्ती आणि बांधकामासाठी करून ठेवली होती. शिवाजी छत्रपतींनी 1.75,000 होन बाजूला ठेवून ते फक्त आणीबाणीच्या प्रसंगी खर्च करावे आणि गडकोटातील साधनसामग्रीसाठी 1.25.000 होनांची तरतूद केली होती.

शिवाजी महाराजांनी सन १६७२ साली आपल्या मुलखात मोठी बांधकामे सुरु करून स्वराज्यातील लोकांना वाढीव वेतन देऊन काम केले. राजे बांधकामासाठी उत्तम कसबी कारागिर शोधत असत. किल्ल्यांच्या बांधकामासाठी महाराजांनी किती देशी, विदेशी तंत्रज्ञानाची मदत घेतली. शिवाजी महाराजांनी जिंजी किल्ल्यांच्या तटबंदीच्या बांधकामासाठी मद्रासकर इंग्रजांकडे युरोपियन इंजिनिअरची मागणी केली. स्वतः शिवाजी महाराजांचे किल्ल्यांच्या बांधकाम व दुरुस्ती कामातील ज्ञान एखाद्या निष्णात इंजिनिअरपेक्षा जास्त होते असे पाश्चात्य संशोधक म्हणतात.

Date

## शिवकालीन किल्ल्यांची प्रशासन व्यवस्था :

शिवकालीन किल्ल्यांची प्रशासन व्यवस्थेतील महत्त्वाच्या बाबी म्हणजे महाराजांना वाटणारे किल्ल्यांचे प्रेम आणि स्व: अनुभवातून त्यांनी केलेले किल्ल्यांच्या प्रशासनातील बदल होत. त्यांनी किल्ल्यांवरील तीन भिन्न जातीतील म्हणजेच मराठा, ब्राम्हण, आणि प्रभु जातीतील अधिकाऱ्यांची नेमणूक होय. कारण या तीन जातींचे एकमेकांशी असलेले वैमनस्य होय.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्लेविषयक धोरण विशद करताना रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्र या ग्रंथात असे म्हणतात की गडकोट संरक्षणाचे कार्य परम नाजूक आहे. एकटास मामलेदारादि जे लोक ठेवावे त्यांनी एखादा भेद केलियामुळे अथवा शत्रू चालोन नामर्दी केल्यामुळे अथवा त्यांचे गाफलीमुळे एकटास दगा झाला तरी एकटसहित तितके राज्य हातीच गेले. उरल्या एकटास व राज्यास उपसर्ग लागला प्रबळ होऊन पावला असला जो गेला किल्ला त्या किल्लेदारांची सर्व दलर किल्लेदारास लागोन तेहि एकटास अपाय म योजतात म्हणजे येकेस शत्रुयास धक्का बसतो.

डा. बाळकृष्ण याबाबत असे म्हणतात की तीन अधिकाऱ्यांची हि पद्धती महाराजांनी केव्हा सुरु केली हे निश्चित सांगता येत नाही. तथापि 1665 साली राजगडावर, हवालदार, सबनीस, सरनोबत, नायकवडी हे अधिकारी होते. त्यामुळे साधारणत 1665 च्या पूर्वी ही पद्धत अस्तित्वात आली असावी.

## हवालदार :

हवालदार म्हणजे किल्लेदार किंवा गडकरी होय. रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्रात म्हणतात की किल्ल्यांचा जीव तो हवालदार, हवालदार हा कुलीन मराठा, निस्पृह वृत्तीचा, विश्वासू, निस्वार्थी, सतत जागरूकपणे सेवा करणारा, स्वामीनिष्ठ, प्रसंगी प्राणाची पर्वा न करणारा असावा. त्याच्यावर किल्ल्यांच्या संरक्षणाची जबाबदारी असे. धन्याने लावून दिलेल्या मर्यादेत राहून दिवसा-रात्री किल्ल्याचे रक्षण करावे. त्याने स्वत: सूर्य मावळताच किल्ल्याचे दरवाजे बंद करावेत. सूर्योदयाबरोबर किल्ल्याचे दरवाजे उघडावेत. कोणत्याही परिस्थितीत किल्ल्यांचे दरवाजे रात्रीच्यावेळी उघडू नयेत अशी शिवाजी महाराजांची सक्त ताकिद होती. हवालदार हा किल्ल्यांवरील शिबंदीचा प्रमुख असे.

## सबनीस :

सबनीस हा ब्राम्हण जातीचा असे. त्याच्याकडे किल्ल्यांचा सजमाखर्च ठेवण्याचे आणि किल्ल्यांवरील लोकांची हजेरी ठेवण्याचे काम असे.

Scanned by CamScanner

## • कारखानीस :

कारखानीस हा प्रभू जातीचा असे. किल्ल्यांवरील अंबर कारखान्याच्या प्रशासनाची जबाबदारी त्यांच्यावर असे. त्यांच्याप्रमाणे अन्नधान्य आणि दारुगोळा यांचा नीट साठा करून त्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी असे.

याशिवाय तटसरनोबत या अधिकाऱ्याची नेमणूक करत. किल्ल्यांच्या प्रत्येक तटावर एक तटसरनोबत नेमत. तटसरनोबताची संख्या गरजेनुसार असे. हा अधिकारी छत्रपतींच्या खास विश्वासातील असे.

## • किल्ल्यांवरील अधिकाऱ्यांची कार्यपद्धत :-

सबनीसाने पैसा आणि जमाखर्चाविषयीचा सर्व पत्रव्यवहार करावा. पण अशा पत्रव्यवहारावर हवालदार आणि कारखानीस यांनी आपले संमतीदर्शक शिक्के उठवावे. सबनीस किल्ल्यावरील लोकांची हजेरी ठेवत असे. पण हजेरीपत्रक तपासण्याचे काम कारखानीस करत असे.

किल्ल्यांवरून होणारा पत्रव्यवहार सबनीस करे पण त्यावर कारखानीसाचा शिक्का असावा लागे. अशा पत्रव्यवहाराची दप्तरात नोंद करून तो किल्ल्याबाहेर पाठविण्याची जबाबदारी कारखानीसावर होती. सबनीसाने ठेवलेल्या हिशोबावर हवालदार आणि कारखानीस यांनी शिक्कामोर्तब करणे गरजेचे होते.

कारखानीस जेव्हा धान्य आणि दारू गोळ्याचे वाटप करत असे तेव्हा सबनीसाचा कारकुन हजर असणे बंधनकारक होते. युद्धात पकडलेली माणसे, जनावरे आणि साहित्य कारखानीसांच्या ताब्यात असावे मात्र त्यावर सबनीसाचा दिला होता.

ग्रँड डफ हा इतिहासकार शिवकालीन किल्ल्यांच्या व्यवस्थेबाबत असे म्हणतो की, किल्ल्यातून आत बाहेर कोणी केव्हा जाणे, गस्त फिरणे, पहारे चौक्या सांभाळणे व त्याजवर देखरेख ठेवणे, पाणी, धान्यसामुग्री इत्यादी तयार ठेवणे या गोष्टीशिवाय सकलीचे आणि सूक्ष्म नियम शिवाजीने तयार केलेले असून प्रत्येक शाखेवरील मुख्य अधिकाऱ्यांची बारीक बारीक कामे सुद्धा ठरवेलेली होती. आणि ते नियम मोडण्यास तिळभर जागा नव्हती. इतके असूनही त्याला हा सर्व बाबींचा खर्च फार काटकसरीने बांधलेला होता.

GoodLuck Page No.
Date

## किल्ल्यांवरील शिबंदी

किल्ल्यावरील शिबंदीचा म्हणजेच सैनिकांचा हवालदार प्रमुख असे. किल्ल्यांवरील सैन्य रचना पुढीलप्रमाणे

८ सैनिक — १ नाईक
३ नाईक — १ जमादार
सर्व जमादार — १ हवालदार

याशिवाय तटांचा बंदोबस्त करून ठेवण्यासाठी तटसरनोबत असेल. त्यांना तटाच्या रक्षणासाठी शत्री पहारा ठेवावा लागे. किल्ल्यांच्या पायथ्याशी असणाऱ्या वाटांवर रामोशी, पटकरी, महार, मांग, बेरड वगैरे लोकांच्या चौक्या असत. त्यांनी हरप्रकारची बातमी मिळवून ती तात्काळ हवालदारास देवून सावध करावे. कारण किल्ल्यांच्या संरक्षणासाची अंतिम जबाबदारी हवालदाराची असे.

## पगाराची व्यवस्था :

किल्ल्याच्या हवालदारास वार्षिक 125 होन, सबनीसास वार्षिक 125 होन आणि कारखानीसास 125 होन इतक्या पगार असे. तर सबनीस सरनोबत या अधिकाऱ्यास वार्षिक 100 होन पगार असे. शिवाजी महाराजांच्या असा कटाक्ष होता की किल्ल्यांवरील लोकांस अउसेरी, नगरी वगैरे वेतन वेळच्यावेळी प्राप्त व्हावे. त्यांची कोणत्याही परिस्थितीत नाराजी होऊ नये म्हणून दक्षता घेतली जाते.

## किल्ल्यांवरील अधिकाऱ्यांच्यासाठीचे नियम :

किल्ल्यांवरील हवालदाराची बदली तीन वर्षांत करावी. सरनोबताची बदली चार वर्षांनी तर सबनीस आणि कारखानीस यांची बदली तर पाच वर्षांनी करावी. त्याचप्रमाणे तटसरनोबत, बारगीर हे सुद्धा नवे-जूने असे करावे. कोणताही अधिकारी मरण पावल्यास त्याची जागा त्याच्या मुलास अथवा भाऊबंदास देऊ नये. किल्ल्यांवरील अधिकारी त्याच्या राहत्या घरापासून दुसऱ्या किल्ल्यांवर नेमावा. कारण घर जवळ आहे म्हणून तो वारंवार घरास जाईल, अशी भिती असे.

याशिवाय किल्ल्यांचे दरवाजे स्वतः हवालदाराने उघडावेत व बंद करावेत. किल्ल्यांत झाडे लावावीत. कोणत्याही परिस्थितीत किल्ल्यांत उंदीर घुशी होणार नाहीत म्हणून काळजी घ्यावी. तसेच किल्ल्यांवरील अधिकाऱ्यांनी आपआपल्या बायकामुलांसह रहावे. दोषी आढळल्यास अधिकाऱ्यास कोणत्याही परिस्थितीत नोकरी वर घेऊ नये.

Scanned by CamScanner